खाजगी प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा साठविणे, व रजेचे रोखीकरण करणे यांच्या कमाल मर्यादा वाढविणेबाबत व अर्जित रजेचे प्रत्यार्पण

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक-एसएसएन १०००/(३३८/२००१)/माशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : ९ एप्रिल, २००१**

पहावे: १) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-अरजा २४०१/७/सेवा-९, दिनांक १५ जानेवारी,२००१
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-अरजा २४०१/८/सेवा-९, दिनांक १५ जानेवारी,२००१

**शासन निर्णय :**

वित्त विभागाने संदर्भांकित शासन निर्णय क्रमांक-१ व २ अन्वयेराज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुक्रमे अर्जित रजेचे प्रत्यर्पण आणि अर्जित रजा साठविणे व रजेचे रोखीकरण करणे यांच्या कमाल मर्यादा वाढविणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिलेले आदेश अशासकीय मान्यताप्राप्त प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही या आदेशान्वये लागू करण्यात येत आहे.

३. हे आदेश दिनांक १ फेब्रुवारी, २००१ पासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

४. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) नियमावली, १९८१ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदी स्वतंत्रपणे सुधारण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक संकेतांक- २००८०९०२१२२५४२००१

( ज. मो. अभ्यंकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
शिक्षण निरीक्षक ( उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई.
सर्व लेखा अधिकारी ( शिक्षण विभाग),
महालेखापाल १/२, ( लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
महालेखापाल १/२, ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुंबई लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व जिल्ह्यांचे कोषागार अधिकारी,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई, पुणे, नागपू, औरंगाबाद,
वित्त विभाग/नगर विकास विभाग/ग्राम विकास विभाग/समाजकल्याण विभाग/आदिवासी विकास विभाग/उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती - माशि-२